# महाविद्यालय विकास समिती सभा

आज मंगळवार दि. २९ नोव्हेंबर २०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता महाविद्यालय विकास समितीची सभा एस. एस. एन. जे. महाविद्यालय, देवळी येथे आयोजित करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी श्री. समीर सुरेशराव देशमुख, अध्यक्ष यशवंत ग्रामीण शिक्षण संस्था, वर्धा हे उपस्थित होते.

सभेला खालील सभासद उपस्थित होते.

१) श्री. समीर सु. देशमुख - संस्थाध्यक्ष

२) श्री. सतीशराव के. राऊत - व्यवस्थापन प्रतिनिधी

३) श्री. प्रकाशराव ज. ढांगे - शिक्षणतज्ञ

४) श्री. शशांकराव शं. घोडमारे - उद्योग

५) श्री. मा. प्रा. सुरेशराव बा. देशमुख - संशोधन

६) श्री. प्रा. टी. एम. मॅन्युअल - IQAC समन्वयक

७) श्री. प्रा. धीमराज क. मुंगल - शिक्षक प्रतिनिधी

८) श्री. प्रा. संतोष दे. मोहदरे - विभाग प्रमुख

९) डॉ. सुषमा रं. कांबळे - शिक्षक प्रतिनिधी (महिला)

१०) श्री. डॉ. प्रभाकर पुं. ढाले - कार्यकारी प्राचार्य

सभेत खालील विषयावर चर्चा होऊन पुढील प्रमाणे ठराव मंजूर करण्यात आले.

विषय क्र. १ मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

ठराव क्र. १ प्रभारी प्राचार्य ढाले यांनी मागील सभेचे इतिवृत्त सभेत वाचून दाखविले. सर्वानुमते कायम करण्यात आले.

विषय क्र. २ आर्थिक वर्ष २०२१-२२ च्या अंकेक्षित जमाखर्चास मान्यता प्रदान करणे.

ठराव क्र. २ प्रभारी प्राचार्य हाले यांनी आर्थिक वर्ष २०२१-२२ करीता अनुदानित तसेच विना अनुदानित अभ्यासक्रमाचे अंदाजपत्रक सभेत सादर केले. त्यावर चर्चा होऊन ते नियमाला अधिन राहून मंजुरी देण्यात येत आहे. असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ३ ग्रंथालय परिचर कु. कुसुम रा. कडु यांच्या सेवानिवृत्तीच्या अर्जावर चर्चा करणे.

ठराव क्र. ३. ग्रंथालय परिचारिका कु. कुसुम रा. कडु ह्या वयोमर्यादेची विहीत अट पूर्ण करून दि. ३१ जानेवारी २०२३ ला सेवानिवृत्त होत असल्यामुळे त्यांचे सेवानिवृत्तीचे प्रस्ताव तयार करणे. व रिक्तपद भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे सभेत सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ४ मा. सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग, नागपूर यांचे नाहरकत पत्रानुसार मुख्य लिपीकाचे रिक्त असलेले पद पदोन्नतीने भरण्यास मंजुरी प्रदान करणे.

ठराव क्र. ४ मा. सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर विभाग, नागपूर यांचे नाहरकत पत्रानुसार सेवा जेष्ठता यादीप्रमाणे वरिष्ठ लिपिक श्री. मनिष प्र. देशमुख यांना मुख्य लिपिक पदावर १/१२/२०२२ या दिनांका पासून मा. अध्यक्षाच्या परवानगीने पदोन्नती देण्याचे सभेत सर्वानुमते ठरले. [illegible]

विषय क्र. ५ सांस्कृतिक सभागृहावरील निकामी झालेले सिमेंटचे पत्रे काढून नव्याने प्रोफाईल टीनचे पत्रे टाकण्या संदर्भात चर्चा करणे

ठराव क्र. ५ सांस्कृतिक सभागृहावरील निकामी झालेले सिमेंटचे पत्रे काढून नव्याने प्रोफाईल टीन पत्रे टाकण्यासाठी दुकानदाराकडून निविदा मागविणे.

सदर निविदा महाविद्यालयाच्या विकास समितीच्या पुढील सभेत मंजुरीसाठी ठेवणे असे सभेत सर्वानुमते ठरविण्यात आले.

विषय क्र. ६- ग्रंथालय परिचर कु. कुसुम रामचंद्र कडु हिच्या नावात बदल करण्याची अनुमती प्रदान करणे.

ठराव क्र. ६ ग्रंथालय परिचारिका कु. कुसुम रा. कडू हिची नियुक्ती (०७ ऑगस्ट १९८७) महाविद्यालयाच्या हस्तावेजात त्यांचे नांव कु. के. आर. कडू असे होते. महाराष्ट्र शासन राजपत्र (नागपूर विभाग) दि. २८ जून २००२ मधील पान नं. १४२२ वरील नोंद क्रमांक (डी. १३३६) अन्वये त्यांचे नांव कुसुम बाबाराव दिघडे असे दर्शविण्यात आले आहे. त्यांच्या नावातील सदर बदलास सभेत, यापुढे महाविद्यालयाच्या दस्तावेजात त्यांचे नाव श्रीमती कुसुम बाबारावजी दिघडे असे नमुद करण्याचे सभेत सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ७- मा. अध्यक्षांच्या अनुमतीने वेळेवर येणारे विषय.

मा. अध्यक्षाच्या अनुमतीने महाविद्यालयातील कर्मचारी यांच्या सुट्या मंजुरी संबंधी विषय प्रत्येक मिटिंगमध्ये घेणे असे सर्वानुमते ठरविण्यात आले. शेवटी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य ढाले यांनी उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानले व मा. अध्यक्षाच्या अनुमतीने सभा संपली.

Offg. Principal
S. S. N. J. Mahavidyalaya
DEOLI, Dist. Wardha

President,
Yeshwant Rural Education
Society, WARDHA.